## विविध स्पर्धांचे आयोजन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# गोवा विद्यापीठात हिंदी दिन उत्साहात

**पणजी** : गोवा विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे नुकताच हिंदी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विभागाच्या अभिव्यक्तीकला मंडळातर्फे करण्यात आले होते. हिंदी दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात निबंध लेखन स्पर्धा, कथालेखन, संवादलेखन, एकलनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, कवितावाचन स्पर्धा व भजन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



गोवा विद्यापीठातर्फे हिंदी दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांसमवेत प्राध्यापक व अन्य मान्यवर.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विद्यापीठाच्या राजनीती शास्त्र विभागाचे अध्यक्ष प्रा. राहुल त्रिपाठी उपस्थित होते. तसेच हिंदी विभागाच्या अध्यक्षा प्रा. वृषाली मांद्रेकर, सहाय्यक प्राध्यापक डॉ. बिपिन तिवारी, श्वेता गोवेकर दीपक वरक आणि पीएचडी विद्यार्थी अभिषेक गुप्ता आणि अभिव्यक्ती कला मंडळाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा कृतिका नाईक उपस्थित होत्या. वृषाली मांद्रेकर यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. त्यांनी हिंदी दिनाचे महत्त्व व हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले. 'राष्ट्रभाषा के बिना राष्ट्र गूंगा है' या महात्मा गांधीजींच्या महत्त्वपूर्ण कथनावर देखील त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

भारत स्वातंत्र्य होऊन ७० वर्षे उलटली, तरी सुद्धा हिंदी भाषेला संविधानिक दर्जा मिळालेला नाही. जरआपली ओळख निर्माण करायची असेल, तर आपली राष्ट्रभाषा असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. राहुल त्रिपाठी यांनी केली. कृतिका नाईक यांनी यंदा होणाऱ्या विविध कार्यक्रमांबद्दल माहिती दिली. यावेळी प्रा. नीना कालर्देरिया उपस्थित होत्या.

विविध स्पर्धांतील विजेत्यांची नावे : वक्तृत्व : क्षितिजा पेडणेकर, मेहताब खान, पूनम शर्मा. भजन : क्षितिजा पेडणेकर, अक्षता नाईक, सोनिया वेळीप. कविता वाचन : मेहताब खान, अंजना गावकर, पूनम शर्मा. निबंध स्पर्धा : योगिता सांगोडकर, सोनिया वेळीप, पूनम शर्मा. कथालेखन : सोनिया वेळीप, सुविता गावकर, प्रेमलता मेधा. संवादलेखन : अक्षता नाईक, तेजस्वी वैज्ज, रतिका जितोणकर.

या स्पर्धांचे परीक्षक म्हणून विद्यापीठातील डॉ. प्रकाश पर्येकर, प्रा. कृपाली नाईक, प्रा. युगांक नाईक, सहायक प्राध्यापक उर्वशी नायक, प्रा. राधिका नागवेकर, प्रा. पूर्वा वस्त, गोवा कला अकादमीतील प्रा. पूजाश्री पालयेकर व नंदा गावस यांनी केले. यावेळी विभागातर्फे तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी निशा रेकडो व रुफिलासनादी यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्वी चारी हिने आभार मानले.

Fri, 27 September 2019
epaper.thegoan.net/c/44059362